**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विजय सदाशिव अडसूळ
मु.पो.शेळगाव(आर), ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
कुर्डुवाडी उपविभाग, ता.बाशी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
कुर्डुवाडी उपविभाग, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
कुर्डुवाडी उपविभाग, ता.बाशी, जि.सोलापूर — श्री.एस.व्ही.तळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
कुर्डुवाडी उपविभाग, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.जी.व्ही.सस्ते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१.२००७ व ६.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.३.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

रोजगार हमी योजना अंतर्गत बार्शी तालुक्यात झालेल्या कामांची दोन वर्षातील माहिती आपण मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी माहिती विस्तृत असल्यामुळे देणे शक्य नसल्याचे जवळजवळ दोन महिन्यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, कुर्डुवाडी उपविभाग, ता.माढा, जि.सोलापूर यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून त्यांना शास्ती लावावी व त्यांची खातेनिहाय चौकशी व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विजय सदाशिव अडसूळ यांनी लेखी निवेदनाद्वारे केली.

श्री.अडसूळ यांच्या अर्जाला विहित शुल्क लावलेले नव्हते. या त्रुटीमुळे तो नाकारला. त्यानंतर त्रुटी पूर्ण न करता अपीलकर्ता यांनी प्रथम अपील केले. त्यांनी मागितलेली माहिती संपूर्ण तालुक्याची दोन वर्षातील, अत्यंत तपशिलवार व विस्तृत आहे. तसेच विशिष्ट नमुन्यात माहिती मिळण्याची मागणी त्यांनी केली होती. ती तयार करून द्यावी लागणार असल्यामुळे त्यांनी शुल्क भरल्यास माहिती देण्याची तयारी आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.जी.व्ही.सस्ते यांनी केले. हा सर्व पत्रव्यवहार खोटा असल्याचे श्री.अडसूळ यांनी लेखी निवेदनामध्ये व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात म्हटले असून माहिती नि:शुल्क मिळण्याची मागणी केली आहे.

श्री.अडसूळ यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी,

कुर्डुवाडी उपविभाग, ता.माढा, जि.सोलापूर यांनी सादर केला. हा पत्रव्यवहार खोटा असल्याचे सिध्द करणारा कोणताही पुरावा श्री.अडसूळ यांनी सादर केलेला नाही. तसेच त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत असून विशिष्ट नमुन्यात ती तयार करून देण्यासाठी प्रमाणाबाहेर साधनसामुग्री लागणार असल्याचे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, कुर्डुवाडी उपविभाग, ता.माढा, जि.सोलापूर यांचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे. संबंधित अभिलेखाचे अवलोकन करून अपीलकर्ता माहिती प्राप्त करून घेऊ शकतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
दि.२५.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. जवाहरलाल आण्णासाहेब रोटे
६४४-ई, १ ली गल्ली, शाहुपूरी, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर
श्री. दिपक शंकरराव चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.८.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मौजे किरवे, खुदळे, मुटकेश्वर व लोंघे, ता. गगनबावडा येथील विकास संस्थेतील कर्ज माफीबाबतची माहिती आपण कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे मागितली होती. बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याच्या कारणावरुन बँकेने ती नाकारली, म्हणून अपीलकर्ता श्री. जवाहरलाल आण्णासाहेब रोटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. रोटे यांनी सभासदनिहाय माहिती मागितली असून अशा प्रकारची माहिती बँकेकडे उपलब्ध नसते. संबंधित संस्थेकडून ही माहिती अपीलकर्त्याने घ्यावी, असे त्यांना कळविले. सभासदनिहाय माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे असते व तशी सिडी जिल्हा उप निबंधकांकडे देण्यात आलेली आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला शासकीय भागभांडवल व बँक कर्जाला शासनाची हमी नाही, त्यामुळे बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे प्रतिपादन कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर श्री. दिपक शंकरराव चव्हाण यांनी केले.

बँकेच्या इन्स्पेक्टरकडे असलेली ही माहिती बँकेकडे उपलब्ध असते, असे अपिलीय प्राधिकारी तथा चेअरमन, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोल्हापूर श्री. पी. जी. शिंदे यांनी नमूद केले. हे लक्षात घेता सहकार खात्याला सादर केलेली ही माहिती बँकेने अपीलकर्त्यासही देणे आवश्यक आहे. त्यानुसार दहा दिवसांत ती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८.१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुदाम ज्ञानदेव नागांवकर
११७/१४, गांधीनगर, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुदाम ज्ञानदेव नागांवकर
११७/१४, गांधीनगर, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर श्री.मिलिंद चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
ता.करवीर, जि.कोल्हापूर विद्यमान-श्री.शिवाजी भोसले, तत्कालीन-श्री.किशोर जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.३.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.७.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मौजे गांधीनगर येथील नगर भूमापन हद्दीतील काही मिळकतींच्या फेरफार नोंदींची माहिती चुकीची, विलंबाने व संगनमताने मिळकती हडप केलेल्या असल्यामुळे फसवणूक करणारी दिली. एकाच कुटुंबातील १३-१४ व्यक्तींना जमीन दिली आहे. माहिती मिळाली आहे, परंतु मूळ विषयात संगनमताने जमिनींबाबत केलेला भ्रष्टाचार दडविला जात आहे. तो उघड करून बेकायदेशीर नोंदी करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुदाम ज्ञानदेव नागांवकर यांनी केली.

मूळ अर्जात श्री.नागांवकर यांनी मिळकतपत्राच्या प्रतींची मागणी केली होती. अन्य माहिती मागितली नव्हती. देऊ केलेल्या नकला त्यांनी स्वीकारल्या नाहीत. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर यांच्या निर्णयानंतर पुरविलेली माहिती त्यांनी स्वीकारली असून तशी पोहोच दिलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.शिवाजी भोसले यांनी केले.

श्री.नागांवकर यांची माहितीची मागणी संदिग्ध होती. अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्याबाबत स्पष्टता करून घेऊन त्यांना माहिती देण्याचे आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार निःशुल्क माहिती दिली. संबंधित धारिका अवलोकनासाठी उपलब्ध करून दिल्या. देशाच्या फाळणीनंतर सिंधी लोकांचे पुनर्वसन करताना गांधीनगर येथे दिलेल्या सनदांच्या आधारे नोंदी केल्या जात आहेत. ते खातेही आता बंद झाले आहे. याबाबतच्या तक्रारीनंतर

जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांमार्फत चौकशी सुरु केली आहे. नव्या नोंदी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार केल्या जात आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर श्री.मिलिंद चव्हाण यांनी केले.

श्री.नागांवकर यांना माहिती देण्यात आली असून तशी स्पष्ट पोहोच त्यांनी दिल्याच्या प्रती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केल्या. जमीन वाटपातील भ्रष्टाचार, संगनमताने बेकायदेशीर नोंदी आदिंबाबत कारवाईची त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१५.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विष्णू काका पवार
सी/४, पी ॲण्ड टी कॉलनी, टिळकनगर, चेंबूर(पश्चिम), मुंबई- अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सांगली, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
विटा, विटा विभाग, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विष्णू काका पवार
सी/४, पी ॲण्ड टी कॉलनी, टिळकनगर, चेंबूर(पश्चिम), मुंबई-

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सांगली, जि.सांगली
प्रतिनिधी श्री.बाळासाहेब वाघमोडे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
विटा, विटा विभाग, जि.सांगली श्री.अमोल तांबे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.९.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांपैकी कोणीही हजर नसल्याने दि.२९.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

समाईक मालकीच्या जागेतील झाडे अन्य वारसांच्या पूर्वसंमतीशिवाय तोडल्याच्या संदर्भात सन १९९९ पासून आपण तक्रार करूनही विटा, ता.खानापूर, जि.सांगली येथील पोलीस ठाण्यातील पोलिसांनी योग्य वेळी कारवाई केली नाही व त्या संदर्भात आपण मागितलेली माहितीही जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, विटा, विटा विभाग, जि.सांगली यांनी दिली नाही. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जिल्हा सांगली यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही. वृक्षतोड कायद्यामध्ये असलेल्या तरतुदींचा भंग होऊनही आपली तक्रार दिवाणी स्वरूपाची असल्याचे कारण पुढे करून कारवाई लांबवली जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विष्णू काका पवार यांनी केली.

सन १९९९ मधील नोटिशीच्या प्रतीची मागणी श्री.पवार यांनी केली आहे. परंतु जतनाच्या वर्गवारीनुसार त्या कागदपत्रांची मुदत दोन वर्षांची आहे. त्यामुळे ते नाश करण्यात आले आहेत. समाईक मालमत्तेच्या मालकी हक्कासंबंधी वाद असून झाडे कोणाच्या मालकीची हा त्यातील मुख्य प्रश्न आहे व तो दिवाणी स्वरूपाचा आहे. त्यामुळे याबाबत कारवाईचे अधिकार पोलिसांकडे नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, विटा, विटा विभाग, जि.सांगली श्री.अमोल तांबे यानी केले. श्री.पवार यांना सर्व माहिती देण्यात आली असून

दिवाणी स्वरूपाची बाब असल्याने पोलिसांनी कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही, असे वारंवार स्पष्ट केले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, जिल्हा सांगली श्री.बाळासाहेब वाघमोडे यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, विटा, विटा विभाग, जि.सांगली अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जिल्हा सांगली यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कुमार महादेव पाथरे
मु.पो.मलकापूर(मंगळवार पेठ), ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सभापती, कोल्हापूर शेती
उत्पन्न बाजार समिती, श्री शाहू मार्केटयार्ड, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, कोल्हापूर शेती
उत्पन्न बाजार समिती, श्री शाहू मार्केटयार्ड, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कुमार महादेव पाथरे
मु.पो.मलकापूर(मंगळवार पेठ), ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सभापती, कोल्हापूर शेती
उत्पन्न बाजार समिती, श्री शाहू मार्केटयार्ड, कोल्हापूर
प्रतिनिधी ॲड.पी.डी.घोलकर व ॲड.ए.एच.पाटील

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा सचिव, कोल्हापूर शेती<br>उत्पन्न बाजार समिती, श्री शाहू मार्केटयार्ड, कोल्हापूर<br>प्रतिनिधी ॲड.पी.डी.घोलकर व ॲड.ए.एच.पाटील | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.१९.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या मालमत्तेची माहिती दिली नाही, भूसपांदनाची ॲवॉर्डनुसार कार्यवाही केलेली नाही. तसेच दोन कागदांचे शुल्क १०० रूपये आकारले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.कुमार महादेव पाथरे यांनी केली.

श्री.पाथरे यानी हीच माहिती यापूर्वीही मागितली होती व त्यांना ती देण्यात आली. तसेच ॲवॉर्डप्रमाणे कृती केली किंवा नाही हा विषय 'माहिती'चा ठरत नाही. शेती उत्पन्न बाजार समितीला जागा अथवा कोणतेही अनुदान मिळालेले नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(एच) अन्वये समिती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. तरीही माहिती देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी ॲड.पी.डी.घोलकर व ॲड.ए.एच.पाटील यांनी केले. श्री.पाथरे यांनी संस्थेच्या मलकापूर, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर येथील जागेवर अतिक्रमण केले असून त्या संदर्भातील वाद दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे.

न्यायालयीन प्रक्रिया लक्षात घेऊन श्री.पाथरे यांना माहिती देण्यात येईल, असे प्रतिपादन ॲड.घोलकर व ॲड.पाटील यांनी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याची भूमिका कायम ठेवून समितीने माहिती देण्याची भूमिका घेतली आहे. तसेच ॲवॉर्डप्रमाणे कार्यवाही केली की नाही, अशा स्वरूपाचे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत निर्णयार्थ येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मुमताज अब्दुल कादर दंडोती
१३०, शास्त्रीनगर, डॉ.अन्सारी चौक, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, प्राथमिक शिक्षण मंडळ,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.आय.बी.हुबळीकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.२.२०६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

विश्वविद्या विकास मंडळ संचलित, मरीयमबी मुमताज उर्दू प्राथमिक शाळा, सोलापूर यांच्याकडून माहिती मिळाली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून अपीलकर्त्या श्रीमती मुमताज अब्दुल कादर दंडोती यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्रीमती दंडोती यांनी दि.२१.११.२००६ रोजी माहिती-मागणीचा अर्ज केला होता. माहिती देण्याबाबत शाळेच्या जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विश्वविद्या विकास मंडळ संचलित, मरीयमबी मुमताज उर्दू प्राथमिक शाळा, सोलापूर श्री.फैय्याज उस्मान इनामदार यांना वेळोवेळी कळवूनही त्यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही. माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास दि.२०.१.२००९ रोजी माहिती देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी(लेखापाल), प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.आय.बी.हुबळीकर यांनी केले.

शाळेच्या जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विश्वविद्या विकास मंडळ संचलित, मरीयमबी मुमताज उर्दू प्राथमिक शाळा, सोलापूर श्री.फैय्याज उस्मान इनामदार यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. याबाबत त्यांना शास्तीची जाणीव देऊन आयोगाला खुलासा सादर करण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी कळवावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी दि.३.११.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक, विश्वविद्या विकास मंडळ संचलित, मरीयमबी मुमताज उर्दू प्राथमिक शाळा, सोलापूर श्री.फैय्याज उस्मान इनामदार यांना खुलासा सादर करण्याबाबत कळविले. तथापि अद्याप असा अहवाल मुख्याध्यापक यांनी सादर केलेला नाही, त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विश्वविद्या विकास मंडळ संचलित, मरीयमबी मुमताज उर्दू प्राथमिक शाळा, सोलापूर श्री.फैय्याज उस्मान इनामदार यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. तसेच खुलासा सादर करण्यासाठी अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी कळविले असतानाही त्यांनी आयोगाला खुलासा सादर केलेला नाही. यास्तव जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विश्वविद्या विकास मंडळ संचलित, मरीयमबी मुमताज उर्दू प्राथमिक शाळा, सोलापूर यांना रुपये २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विश्वविद्या विकास मंडळ संचलित, मरीयमबी मुमताज उर्दू प्राथमिक शाळा, सोलापूर श्री.फैय्याज उस्मान इनामदार यांच्याकडून फेब्रुवारी २०१०, मार्च २०१० व एप्रिल २०१० मध्ये अनुक्रमे जानेवारी २०१०, फेब्रुवारी २०१०, मार्च २०१० या महिन्यांच्या देय असलेल्या वेतनातून तीन हप्त्यांत कपात करून, शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०० १६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी करून तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि.२७.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शरद सखाराम सोनावणे
श्रमसाफल्य बंगला, सगुणामाता नगर, महातपुरा पेठ,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा — मूळ अर्जदार

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हा निबंधक, सहकारी संस्था,
सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा श्रीराम शेतकरी कामगार सहकारी ग्राहक संस्था मर्यादित, मु.पो.फलटण, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८४+५१५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**मूळ अर्जदार** श्री.शरद सखाराम सोनावणे
श्रमसाफल्य बंगला, सगुणामाता नगर, महातपुरा पेठ,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हा निबंधक, सहकारी संस्था,
सातारा, जि.सातारा प्रतिनिधी श्री.एस.वाय.माने

**जन माहिती अधिकारी** तथा जनरल मॅनेजर, श्रीराम शेतकरी कामगार सहकारी ग्राहक
संस्था मर्यादित, मु.पो.फलटण, ता.फलटण, जि.सातारा प्रतिनिधी ॲड.डी.पी.खुर्जेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.९.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

महाराष्ट्र सहकार कायदा १९६०, कलम ३२ नुसार आपण सभासद म्हणून मागितलेली माहिती श्रीराम शेतकरी कामगार सहकारी ग्राहक संस्था मर्यादित, मु.पो.फलटण, ता.फलटण, जि.सातारा यांनी दिली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ खाली तीच माहिती मागितली तरीही ती दिली नाही, म्हणून श्री.शरद सखाराम सोनावणे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हा निबंधक, सहकारी संस्था, सातारा यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हा निबंधक, सहकारी संस्था, सातारा यांनी संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरवून माहिती देण्याचे आदेश दिलेले असतानाही माहिती दिली नाही, ती मिळावी, म्हणून राज्य माहिती आयोगाकडे अपील (क्र.५१५) केले आहे. याच विषयाबाबत, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ आपल्याला लागू नसल्याचे कारण देऊन संस्थेने माहिती नाकारली. परंतु संस्थेने माहिती देणे आवश्यक आहे, असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. हा निर्णय बेकायदेशीर असून रद्द करावा या मागणीसाठी जनरल मॅनेजर, श्रीराम शेतकरी कामगार सहकारी ग्राहक संस्था मर्यादित, मु.पो.फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.जयराम विश्वनाथ राजमाने यांनी अपील (क्र.४८४) केले आहे.

माहिती तयार असून सहकार कायद्याच्या कलम ३२ प्रमाणे अभिलेख अवलोकन करून माहिती प्राप्त करून घेण्यास श्री.सोनावणे यांना कळविले, परंतु ते आले नाहीत. त्यानंतर त्यांनी मुद्रांक न लावता माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला. परंतु श्रीराम शेतकरी कामगार सहकारी ग्राहक संस्था मर्यादित, मु.पो.फलटण, ता.फलटण, जि.सातारा ही संस्था सहकारी ग्राहक संस्था असून शासनाची मदत अथवा अनुदान नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(एच) मधील तरतुदीनुसार संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. त्यामुळे या कायद्याखाली माहिती देणे नाकारले. श्री.सोनावणे माहितीचा अधिकार कायदा व सहकार कायदा या कायद्यांची गल्लत करून दिशाभूल करीत आहेत, असे प्रतिपादन जनरल मॅनेजर, श्रीराम शेतकरी कामगार सहकारी ग्राहक संस्था मर्यादित, मु.पो.फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.जयराम विश्वनाथ राजमाने यांचे प्रतिनिधी ॲड.डी.पी.खुर्जेकर यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने पाहता शासनाकडून संस्थेला २१.४० लाख रूपये भागभांडवल व फर्निचर आदी कारणांसाठी ५.७० लाख अर्थसहाय्य मिळाले होते. ही सर्व रक्कम संस्थेने २.७३ लाख रूपये व्याजासह परत केली आहे. हे लक्षात घेता संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, हे ॲड.खुर्जेकर यांचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि.२१.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश चिमाजी जहागिरदार — अपीलकर्ता
शुभंकर, प्लॉट क्र.५, कंगीकर सोसायटी,
हॉटेल नागालँड मागे, पंढरपूर, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर तर्फे प्रतिनिधी श्री. एस. वाय. जाधव<br>**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर श्री. शेषराव यशवंतराव जाधव | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.६.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स तसेच दि. ३०.६.२००९ रोजी राज्य माहिती आयुक्तांपुढे झालेल्या सुनावणीसही अपीलकर्ता उपस्थित नव्हते.

पंढरपूर येथील ज्येष्ठ नागरिक संघटनेबाबतची माहिती संस्थेने दिली नाही, म्हणून आपण जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे अर्ज केला. त्यांनी ती दिली नाही. दहा दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर श्री. ए.एम. अंबाळकर यांनी देऊनही जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्तता केली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री. रमेश चिमणाजी जहागिरदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संबंधित संस्थेचा नोंदणी क्रमांक नमूद केलेला नाही, तो नमूद करून अर्ज केल्यास त्या संस्थेच्या घटनेच्या प्रमाणित प्रती पुरविता येतील, तसेच पाच रूपये मुद्रांक लावून साधा अर्ज करूनही नकला घेता येतील, असे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर श्री. शेषराव यशवंतराव जाधव यांनी अपीलकर्त्यास अर्जाच्या दुसऱ्या दिवशी कळविले आहे. मात्र हे तांत्रिक उत्तर असून न्यासाचा नोंदणी क्रमांक शोधून जन माहिती अधिकाऱ्यांनी ३० दिवसांत माहिती द्यावयास हवी होती, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर श्री. ए.एम. अंबाळकर यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयात म्हटले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांची कृती तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे, तसेच अपीलकर्त्याने संबंधित संस्थेचा नोंदणी क्रमांक पुरविणे आवश्यक होते. मात्र अपीलकर्त्याचे ज्येष्ठ नागरिकत्व लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर श्री. ए. एम. अंबाळकर यांचा निर्णय उल्लेखनीय असून जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांनी त्यानुसार पूर्तता करणे आवश्यक आहे. आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांनी ज्येष्ठ नागरिक संघटना या संस्थेची घटना आणि नियमावलीची प्रत अपीलकर्त्यास आठ दिवसांत पुरवून आयोगास अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश निवृत्ती देसाई
१८७, शनिवार पेठ, मुळीक लेन, हेडपोस्टाजवळ, कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
सातारा जि.सातारा — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
कराड, ता.कराड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०४ /सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश निवृत्ती देसाई
१८७, शनिवार पेठ, मुळीक लेन, हेडपोस्टाजवळ, कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सातारा,
जि.सातारा डॉ.दिगंबर प्रधान

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.५.२.२००९ रोजी घेण्यात आली.

आपण कराड येथील ज्युडि.मॅजि.प्रथमवर्ग यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या फौजदारी दाव्याबाबत चौकशी करण्याचे आदेश न्यायालयाने पोलिसांना दिले. या चौकशीबाबतचा अहवाल व त्या अनुषंगाने अन्य मुद्दयांची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कराड, ता.कराड, जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. परंतु आपण केलेली विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(च) मध्ये अंतर्भाव होत नसल्यामुळे या अधिनियमाच्या कलम ८(१)(ज) अन्वये माहिती नाकारल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कराड, ता.कराड, जि.सातारा यांनी कळविले व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सातारा यांनी त्यास मान्यता दिली. मूळ तक्रारीला १४ महिने होऊन गेल्यानंतरही तपास चालू असल्याचे सांगितले जाते. राजकीय व वरिष्ठांच्या दबावाने चौकशीचे काम संशयास्पद व मंदगतीने सुरू आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सुरेश निवृत्ती देसाई यांनी केले.

न्यायालयात गुन्हा दाखल केला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार प्रकरण पोलिसांकडे तपासासाठी आल्यानंतर श्री.देसाई यांनी माहिती मागितली. तपास चालू असल्यामुळे त्यावेळी माहिती दिली नाही. न्यायालयाला सादर केलेल्या अहवालाची प्रत अपीलकर्त्याने योग्य शुल्क भरल्यावर आता देण्यास तयार आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सातारा डॉ.दिगंबर प्रधान यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.देसाई यांनी मुद्दा क्र.७ वगळता बहुसंख्य मुद्दयांमध्ये खुलासा, स्पष्टीकरण, मत, भाष्य यांची मागणी केली आहे. अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या संज्ञेत समाविष्ट होत नाही, हे जन माहिती अधिकारी तथा व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सातारा डॉ.दिगंबर प्रधान यांचे निवेदन रास्त आहे. पोलिसांनी न्यायालयाला सादर केलेल्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास योग्य ते शुल्क भरून अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सातारा यांच्याकडून प्राप्त करून घेता येईल. अपिलीय प्राधिकारी यांनी त्यानुसार कार्यवाही करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२१.१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले
सिध्दिविनायक प्रसाद, डॉ. शामा प्रसाद मुखर्जी रोड,
डोंबिवली (पुर्व), ता.कल्याण, जि.ठाणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (विशेष)
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.५.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. सु.ब.सावस्कर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

ठाणे महानगरपालिकेच्या कर वसुली विभागाकडून मालमत्ता कराची आकारणी करताना अधिकृत व अनधिकृत बांधकामाची माहिती घेण्यात येते. ती माहिती आपल्याला देण्यात आली. सोलापूर महानगरपालिकेकडे अशीच माहिती मागणी केली असता कर आकारणी विभागाकडून

अशा प्रकारची माहिती संकलित केली जात नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी कळविले. बांधकामाची कर आकारणी करताना जर अशा प्रकारची माहिती घेतली जात नसेल, तर योग्य ती शहानिशा न करता कर आकारणी केली जाते, असा याचा अर्थ होतो, असे लेखी प्रतिपादन अपीलकर्ता श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलामधील अर्जात केले आहे.

अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती उपलब्ध नसल्याचे उत्तर देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी सांगितले. अपीलकर्त्याच्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही केली असली तरी अधिकृत व अनधिकृत बांधकामाची नोंद सोलापूर महानगरपालिकेत कोणत्याच विभागात होत नाही, असा त्याचा अर्थ होतो. ही बाब गंभीर आहे. महानगरपालिकेच्या अधिकार कक्षेतील सर्व बाबींविषयी वस्तुस्थितीची संपूर्ण माहिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अशतः मान्य.

२. सोलापूर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील अधिकृत व अनधिकृत बांधकामांबाबतची नेमकी माहिती नागरिकांना उपलब्ध करुन दिली जाणे आवश्यक आहे. सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रशासकीय प्रमुख म्हणून आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी अशी माहिती संकलित करण्याची कार्यवाही त्वरित करुन दि. २५.२.२०१० पर्यंत माहिती उपलब्ध करुन द्यावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. २८.१.२०१०**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. भिमराव विष्णू बागडी
२५९-ई, ऐश्वर्या पार्कसमोर, जिल्हाधिकारी
कार्यालयामागे, कनानगर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अवसायक,
श्री दत्त सहकारी साखर कारखाना लि., आसुर्ले-पोर्ले,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. भिमराव विष्णू बागडी
२५९-ई, ऐश्वर्या पार्कसमोर, जिल्हाधिकारी
कार्यालयामागे, कनानगर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी डी. एस. साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा अवसायक,
श्री दत्त सहकारी साखर कारखाना लि., आसुर्ले-पोर्ले,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. एस.एस. कुंभार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.९.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सलग १७ वर्षे आपण सेवा करुन कायम कर्मचारी असतानासुध्दा रोजंदारीवर असल्याच्या कारणावरुन आपल्याला श्री दत्त सहकारी साखर कारखाना लि., आसुर्ले-पोर्ले, ता. पन्हाळा या कारखान्याने कमी केले. कर्मचाऱ्यांना कायम करण्याचे आदेश दि.११.११.२००३ रोजी झालेले असून हे आदेश मिळालेल्या कर्मचाऱ्यांनी आस्थापना रजिस्टरवर सह्या केलेल्या आहेत. त्याची प्रत न देता आपल्याला खोटी प्रत दिली आहे. कायम करण्याच्या आदेशाच्या प्रतीही कारखान्याने त्यांच्याकडेच ठेवल्या आहेत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. भिमराव विष्णू बागडी यांनी केली.

अपीलकर्त्याने वेळोवेळी हा प्रश्न मांडला असून त्या त्या वेळी उत्तर देण्यात आले आहे. ते म्हणतात त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांना कायम करण्याचे आदेश कारखान्याने दिलेले नाहीत. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कारखान्याकडील आस्थापना रजिस्टरची प्रत दिली असून अर्जातील सर्व मुद्दयांचे उत्तर दिले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अवसायक, श्री दत्त सहकारी साखर कारखाना लि., आसुर्ले-पोर्ले, ता. पन्हाळा यांचे प्रतिनिधी श्री. एस. एस. कुंभार यांनी केले. ते रास्त असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग,कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. डी. एस. साळुंखे यांनी केले.

अपीलकर्ता यांना आवश्यक असल्यास कारखान्याकडील कागदपत्रांचे अवलोकन करु द्यावे व त्यातील त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २८.१.२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप सिताराम देशपांडे
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहआयुक्त(पुणे विभाग),
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य,
स.नं.७९१/९३, लकी बिल्डिंग, नवीन गुरुवार पेठ, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य,
छत्रपती शिवाजी हौसिंग सोसायटी, सदर बाजार, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप सिताराम देशपांडे
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहआयुक्त(पुणे विभाग), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य,
स.नं.७९१/९३, लकी बिल्डिंग, नवीन गुरुवार पेठ, पुणे श्री.स.अ.मोमीन

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य,
छत्रपती शिवाजी हौसिंग सोसायटी, सदर बाजार, सातारा श्री.अ.मा.खडतरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.९.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

फलटणमधील एका औषध दुकानाच्या संदर्भातील माहिती शुल्क भरूनही दिली नाही. म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.दिलीप सिताराम देशपांडे यांनी केली.

श्री.देशपांडे यांच्या दि.१४.७.२००८ च्या अर्जाला दि.३०.७.२००८ रोजी उत्तर देऊन शुल्क भरण्यास कळविले. दि.४.८.२००८ रोजी त्यांनी शुल्क भरले. माहितीची मागणी त्यांनी व्यक्तीशः केली होती. दि.६.८.२००८ पर्यंत त्यांनी माहिती प्राप्त करून न घेतल्यामुळे माहिती तयार असून व्यक्तीशः घेऊन जाण्यास त्यांना दि.६.८.२००८ च्या पत्रान्वये कळविले. तरीही त्यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे, माहिती तयार असल्याचे व टपालाने आवश्यक असल्यास टपालखर्च कार्यालयात जमा करण्याचे दि.२१.८.२००८ च्या पत्रान्वये कळविले. त्यावर त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. या बाबी लक्षात घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा सहआयुक्त(पुणे विभाग), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी श्री.देशपांडे यांचे अपील फेटाळले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी माहिती समक्ष देऊन पोहोच घेतली, असे जन माहिती अधिकारी

तथा सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, सातारा श्री.अ.मा.खडतरे व अपिलीय प्राधिकारी तथा सहआयुक्त(पुणे विभाग), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी पूरक कागदपत्रांसह लेखी व तोंडी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि२५.१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रकाश भिमराव रणदिवे — अपीलकर्ता
मु.पो. तुंगत, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, इंदिरा शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर<br>तर्फे प्रतिनिधी श्री. एस. वाय. जाधव | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.६.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स, तसेच दि. ३०.६.२००९ रोजी राज्य माहिती आयुक्तांपुढे झालेल्या सुनावणीसही अपीलकर्ता उपस्थित नव्हते.

इंदिरा शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर यांचे जन माहिती अधिकारी तथा सचीव, यांनी माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दहा दिवसांत माहिती निःशुल्क देण्याचा आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी पूर्तता केली नाही, म्हणून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रकाश भिमराव रणदिवे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री. रणदिवे यांनी सन १९९३ ते १९९६ या काळातील माहिती मागितली होती. १२ वर्षांपूर्वीची ही माहिती उपलब्ध नसल्यामुळे विहित मुदतीत कळविले. ऊर्वरित सर्व माहिती विहित मुदतीत दिली, असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, इंदिरा शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर श्री. शंकर रामचंद्र माने यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळासाहेब कलगोंडा पाटील — **अपीलकर्ता**
मु.पो.चिंचवाड, ता.करवीर, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक निबंधक, — **उत्तरवादी**
सहकारी संस्था करवीर, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,
चिंचवाड विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्या.
चिंचवाड, ता.करवीर, जि.कोल्हापूर.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **५१/२०१०/ कोल्हापूर** |
| २ | अपिलीय प्राधिका-यांने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.११.२००८ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** संस्थेतील नोकरांना वयाच्या कोणत्या वर्षी निवृत्त केले त्याबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री बाळासाहेब कलगोंडा पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखल स्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०-१-२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती ज्योती गणपतराव जाधव
गोकर्ण कॉलनी, संगमनगर, सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, अपंग कल्याण(मूकबधीर प्रवर्ग),
अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अपंग कल्याण(मूकबधीर प्रवर्ग),
अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५११ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती ज्योती गणपतराव जाधव
गोकर्ण कॉलनी, संगमनगर, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, अपंग कल्याण(मूकबधीर प्रवर्ग),
अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.एच.आर.कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा अपंग कल्याण(मूकबधीर प्रवर्ग),
अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.पी.व्ही.चौगुले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन २००५ ते २००८ या काळात समता शिक्षण प्रसारक मंडळाच्या मूकबधीर विद्यालयाच्या अनुषंगाने आपण केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्रीमती ज्योती गणपतराव जाधव यांनी केली.

श्रीमती ज्योती जाधव, संस्थेचे पदाधिकारी व समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, सातारा यांची तक्रारींच्या संदर्भात एकत्रित चर्चा झाली. परंतु दरम्यानच्या काळात अपंग कल्याण आयुक्तांची बदली व नंतर नियमित आयुक्त नसल्याने निर्णय न झाल्यामुळे कार्यवाही झाली नव्हती. त्यामुळे माहिती देता आली नाही. ती प्रक्रिया पूर्ण झाली असून दोन दिवसात माहिती देता येईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा अपंग कल्याण(मूक बधीर प्रवर्ग), अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.पी.व्ही.चौगुले यांनी केले. त्यानुसार माहिती देऊन आयोगाला प्रत सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती श्रीमती जाधव यांना दि.१८.३.२००९ रोजी समक्ष देण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त अपंग कल्याण(मूक बधीर प्रवर्ग), अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.एच.आर.कांबळे यांनी दि.२१.३.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत

केले. संबंधित विषयातील कार्यवाहीची अर्जाच्या वेळच्या स्थितीची माहिती जन माहिती अधिकारी तथा अपंग कल्याण(मूक बधीर प्रवर्ग), अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अपीलकर्त्यास देऊ शकले असते. विहित मुदतीत पत्रव्यवहार करण्याची समज जन माहिती अधिकारी तथा अपंग कल्याण(मूक बधीर प्रवर्ग), अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.पी.व्ही.चौगुले यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि२९.१.२०१०